MHNG100014562020

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७६४/२०२०
राज्य – विरुध्द – आनंद

## निशाणी क्रमांक १ वर आदेश
## (पारित दिनांक १२ मार्च, २०२६)

प्रस्तुतचे दोषारोपपत्र हे महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ई अन्वये दाखल करण्यात आलेले आहे. आरोपी हजर झाले. न्यायालयाने आरोपाचा आशय नि.क्र. ०८ अन्वये नोंदवून घेतला.

२. अभिलेखाचे अवलोकन केले. विशेष म्हणजे प्रकरणामध्ये रासायनिक पृथकरणाचा अहवाल दाखल आहे.

३. मा. सर्वोच्च न्यालयाने Raj Deo Sharma Vs. State of Bihar, AIR 1998 Supreme Court 3281, यामध्ये मा न्यायालयाने निर्देश दिले आहे..In cases where the trial is for an offence punishable with imprisonment for a period not exceeding 7 years, whether the accused is in jail or not, the court shall close the prosecution evidence on completion of period 2 years from the date of recording of plea of the accused on the charges framed whether the prosecution has examined all the witnesses or not, within the said period and the court can proceed to next step provided by law for the trial of the case.

४. न्यायालयाने दि.२३.०६.२०२२ रोजी आरोपीचे, आरोपाचा आशय नोंदवून घेतला. परंतु, त्यानंतर ४ वर्ष उलटुन गेल्यावर दोखील साक्षीदार हजर झाले नाही. इतर कोणतेही साक्षीदार हजर नाही. त्यामुळे आरोपी गैरहजर राहत आहे, असे दिसून येते. खटला

हा संक्षिप्त स्वरुपाचा आहे. त्यामुळे प्रकरण प्रलंबित ठेवून काहीही उपयोग होणार नाही. त्यामुळे मी प्रकरणात फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २५८ अन्वये कार्यवाही करीत आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५८ अन्वये प्रकरण हे बंद करण्यात येऊन आरोपी यांस विना दोषारोप मुक्त करण्यात येते. आरोपीचा जामीन कब्जा व जातमुचलका हा रद्द करण्यात येतो.

२. जप्त मुद्देमाल हा योग्य त्या कार्यवाहीसाठी राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, नागपूर यांच्याकडे पाठविण्यात यावा.

३. सबब प्रकरण नस्ती करण्यात येते.

Sd/-

उमरेड

**( रा.भा. डोळे )**

दिनांक : १२.०३.२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उमरेड